
ISSN 2278-9243

# कविता-रती

मे-जून २०२२

वर्ष ३७ वे : अंक ४



कवी आणि संपादक पुरुषोत्तम पाटील यांच्या स्मरणार्थ
काव्य, काव्यविचार, काव्यसमीक्षा व कविविमर्श यांना वाहिलेले द्वैमासिक

# कविता-रती

संस्थापक संपादक : पुरुषोत्तम पाटील संपादक : आशुतोष रमेश पाटील

मे-जून २०२२ ❑ वर्ष ३७ वे : अंक ४ था

## लेख

१. संत कर्ममेळा यांचे अभंग: अर्थ नि अन्वयार्थ - माधव पुटवाड ३-२१
२. एकनाथी भागवत आणि श्रीचक्रधर - हंसराज जाधव २२-२८

## कविता

अश्विन चव्हाण २८, कमलेश महाले, सागर चव्हाण २९

## परीक्षण

सात्त्विक चिंतनशीलतेचा निखळ प्रत्यय देणारी कविता : 'अवघेचि उच्चार' (राजू देसले) - अरुण ठोके ३०- ३५

## प्रतिसाद

विविधरंगी उत्कट अभिव्यक्ती ! : 'अलूफ' (सदानंद डबीर ) - परशुराम देशपांडे ३६-३८

## कविता

कीर्ती जाधव, आनंद देशमुख ३९

## आंतरभारती

१. समकालीन जीवघेण्या वास्तवाचा वेध : 'रक्तचंदन' (संजीव वेरेंकार) - जयप्रभू कांबळे ४०-४३
२. उमेदीच्या पहाडावर उभा असलेला द्रष्टा कवी : कुमार अंबुज - विकास पालवे ४४-५८

## कविता

मृदुला भाटकर ५९-६०

## मुखपृष्ठ

प्रमोदकुमार अणेराव

प्रकाशक-व्यवस्थापन-अक्षरजुळवणी - प्रकाश पुरुषोत्तम पाटील

कार्यालयीन साहाय्य व मुद्रितशोधन - पंकज माळी

# सात्त्विक चिंतनशीलतेचा निखळ प्रत्यय देणारी कविताः 'अवघेचि उच्चार' (राजू देसले)

अरुण ठोके

राजू देसले हे साहित्य, चित्रकला, चित्रपट, संगीत अशा विविध कलांत अभिरुचीसंपन्न असलेल्या व्यक्तिमत्त्वाचे धनी आहेत. त्यांचे कलाप्रेम व मित्रसंग्रह सर्वश्रुत आहे. त्यांच्या कवितांचा अत्यंत देखणा संग्रह कॉपर कॉईन प्रकाशन, दिल्ली यांनी डिसेंबर २०२० मध्ये प्रकाशित केलेला आहे.

५१ संहिता असलेल्या 'अवघेचि उच्चार' या कवितासंग्रहात आत्मसंवादातून आत्मशोध, हृदयस्थ विषयवस्तुंचे आकलन करून घेण्याची आसक्ती, भौतिकतेपेक्षा अधिभौतिकतेतून मिळणाऱ्या सुखलोलपतेची आस आणि दुःखानुभूतींना भिडणारी संयत वृत्ती असे काही खास, कवीच्या काव्यव्यक्तिमत्वाचे विशेष विचक्षण वाचकांना सहजपणे प्रत्ययाला येतील. 'चैतन्य सळसळ', 'मौनाचं झाड', 'ब्रम्ह', 'कोलाहल', 'मौनाच्या लाटा', 'धुम्मस', 'सृजन दिंडी', 'कवितेच्या मैक्झिमम उत्सर्जनासाठीः एक समरगीत', 'मूकसंवाद', 'समधिस्थ कवितेच्या ओठी' यांसारख्या कवितांच्या शीर्षकावरून या कवितांची वेगळी जातकुळी चटकन नजरेत भरते. राजू देसले यांच्या कवितांतून सात्त्विक चिंतनशीलतेचा निखळ प्रत्यय येतो. कलानिर्मिती कशी होते? त्यावेळी कलावंताचा कोणत्या अनुभूतींतून प्रवास सुरू असतो? यांसारख्या लौकिक-अलौकिक विषयवस्तूला कवितेतून तरलपणे अभिव्यक्त केले आहे. कलेच्या जीवनसन्मुखतेचा उद्घोष करताना कवीला चैतन्याची सळसळ ऐकू येते. चित्रकारासाठी कॅनव्हास दुखरा ठरतो. एका अर्थाने कोणत्याही प्रकारची निर्मिती ही वेदनांकित असते. निर्विकार कलाकृतीची संकल्पना जगन्मान्य नसल्याने कलावंताकडून मूर्त किंवा अमूर्ताचा ध्यास धरणे अपरिहार्य ठरते. कलावंताचे संवेदनशील असणेच त्याला डोळस बनवते. हे डोळसपण; देसलेंच्या विचक्षण कलादृष्टीच्या प्रत्यय त्यांची कविता देते. कलावंतासाठी कोणत्याही प्रकारची निर्मिती ही सुख-दुःखाच्या अद्वैत अनुभवाची साक्ष असते. म्हणून सृजनाचा लाल कोवळा कोंभ उमलताना नक्षत्र पायाखाली चिरड्याचे दाहक भास, जीवघेण्या आकांतासह सोसल्याची अनुभूती प्रकट करण्यात येते. अशा स्थितीतच अव्यक्त ते व्यक्त होते. कवीला अशी मौनाची चित्रलिपी शब्दांतून हलकेच उलगडण्याचे कसब प्राप्त झाले आहे.

मूर्त, अमूर्त, मौन, चैतन्य यांसारखे तत्त्वज्ञानातील शब्द चूष म्हणून कवितेत आलेले नाहीत. कवी कलानिर्मितीचा विचार दार्शनिक पातळीवरून करीत असल्याने कवितेतील शब्द, प्रतिमा व प्रतीके कवितेच्या अपरिहार्य निकडीतून अर्थातच स्वाभाविकपणे अवतरलेले

दिसतात. प्रचलित लोकोक्ती, धारणांना शह देताना कवी, चित्र, संगीत व तत्त्वज्ञानाचा एकत्रित विचार करून नवा काव्याशय मितव्ययी शैलीतून घडवतो.

छोट्या-छोट्या गोष्टींतून मिळणारे सुख हे तात्कालिक आहे. कलावंत नेहमीच जगणे सुखकर करण्यासाठी झटत असतो. यासाठी तो आपल्या आतल्या चैतन्याची सळसळ म्हणजे सत्याचा शोध घेऊन ते कलाकृतीतून मांडण्याचा प्रयत्न करतो. अशा वेळी त्याला एकीकडे सृजनाचा लाल कोवळा कोंभ उमलताना, म्हणजे स्वतःची कलाकृती निर्माण होत असताना मिळणारा विरळा आनंद तर दुसरीकडून व्यावहारिक जगाच्या तडाख्याने नक्षत्र पायाखाली चिरडले जाणे, म्हणजे त्याने कल्पना केलेल्या सुंदर जीवनाला स्वप्नांना, माणुसकीला लाथाडले जाणे होय. अशा वेळी त्याच्यातील संवेदनशीलतेमुळे त्याला ही स्थिती जीवघेण्या आकांताची वाटते. अशा पर्यावरणातून उजळून निघत जी कविता किंवा चित्र आकाराला येते त्यातून यापूर्वी न बोलल्या गेलेल्या गोष्टी, स्थिती वा घटिते हलकेच साकारतात. सामाजिक, राजकीय स्थिती जेव्हा असुरक्षितता निर्माण करते तेव्हा दबावाच्या, तणावाच्या व अन्यायाच्या विरोधात अन्य लोक अबोल राहणे पसंत करतात. काही कलावंतही सोयिस्कर मौन धारण करतात. सच्चा कलावंत मात्र सत्याच्या शोधासाठी समाजाने धारण केलेल्या, कुंठित झालेल्या व्यवस्थेच्या मौनाची चित्रलिपी अलगदपणे उलगडवून दाखवतो. वानगीदाखल ही एक संहिता पहा, 'मौनाच्या झाडाला/ फुलं बिनवासाची,/ कॅनव्हासवरच्या रानात/ शोधत राहतात बुबुळं/ हरवलेल्या आशयाचं उजाडपण/ अध्यात्माच्या वळचणीला/ चिंतनाचा झरा रंगातून/ सर्वदूर/ चित्र काही म्हणू पाहते/ चौकटीबाहेरही' (अवघेचि उच्चार, पृ. ११)

प्रस्तुत कवितेत मौनाचं झाड हे अनोखे प्रतीक माणसाच्या वाचाविरामामागील भयसूचन करते. झाड म्हणजे माणूस या अर्थाने मराठी लोकगीतांत झाड या प्रतीकाची योजना केलेली दिसते. एखाद्या रोगी व्यक्तीला भगताकडे नेल्यावर अबोल रोग्याला (झाडाला) भूताने झपाटलेले असल्याची समजूत असायची. रोग्याच्या शारीरिक वा मानसिक आजारांशी संबंधित नसलेल्या गोष्टी भगत करायला सांगत असे. अर्थातच ही अंधश्रध्दा होती. कवी समाजातील कमजोर, भित्र्या माणसांच्या भीतीपोटी अध्यात्माच्या वळचणीला जाण्याची कृती सूचकपणे सांगतो. अशा माणसांचे घाबरलेपण चित्रकार कॅनव्हासवर रंगवू पाहतो. परंतु अबोल बनलेल्या, रोगी समजल्या जाणाऱ्या माणसाला आकळणे केवळ चित्रापुरतेच मर्यादित न ठेवता आपण चित्राच्या चौकटीबाहेरही पाहयला हवे, असे कवी म्हणतो.

झाडे म्हणजे माणसे या अर्थाने आपण कविता वाचू लागलो की, 'झाडांबद्दल' या कवितेत कवी झाडांविषयी बोलत नसून माणसांविषयी बोलत आहे, हे सहजपणे उमगत जाते. कवीला माणसांपेक्षा झाडे नेहमीच निरूपद्रवी, प्रेमळ व निःस्वार्थी वाटले असावेत. अशी काही झाडांच्या गुणांशी साम्यता असलेली चांगली माणसे कवीच्या आयुष्यात

आल्यामुळे तो माणसांना झाडे संबोधतो. सर्वच जिव्हाळ्याच्या विषयवस्तुंना तो झाडांशी जोडतो. उदाहरणार्थ आई, कविता, आत्मा, मौन, दुःख, कुटुंब, मन आदी. कवितेतील ‘मी’ला आईकडून लाभलेले अमोघ प्रेम आणि तिची विलक्षण करूणामय शिकवण त्याला जेव्हा-जेव्हा आठवते तेव्हा आईसमवेत केलेला संवाद त्याला झाडांच्या ओथंबलेल्या कोवळ्या कुजबूजीप्रमाणे वाटतो. कोवळी पाने ही प्रतिमा कवितेतील ‘मी’ व त्याच्या भावंडासाठी योजलेली आहे. बालपणी आईने चिमुरड्यांना अत्यंत प्रेमाने दिलेल्या चांगुलपणाचा कवितेतील ‘मी’वर विलक्षण प्रभाव पडलेला आहे. आईने दाखवलेला प्रेममय जीवनमार्ग, सत्याची आस म्हणजेच आई नावाचं झाड कवितेतील ‘मी’च्या आतड्यात घट्ट मुळं रोवून असल्याची अनुभूती तो प्रकट करतो. हाच आदर्श घेऊन तो समाजात वावरताना सहजपणे माणसे जोडण्याची किमया साधतो. कवितेतील ‘मी’च्या या माणूसघाण्या वृत्तीचे रहस्य म्हणजे त्याला आईकडून मिळालेला हा अमूल्य ठेवा होय.

राजू देसलेंच्या कवितेत मातेचा आदिबंध हा एक विशेष निराळ्या पद्धतीने येतो. आईविषयीचा आत्यंतिक जिव्हाळा विलोभनीय शब्दांतून अभिव्यक्त झालेला आहे. कवितेतील ‘मी’साठी आई ही सर्व सुखांचा पार आहे. आईशिवाय इतरांचे बोलणे सुखकारक नसल्याने आईने दिलेल्या वत्सल हाकेतून चांदण्यांचा अलवार पाऊस कोसळल्याची अनुभूती व्यक्त करण्यात आलेली आहे. कवितेतील चांदणे ही प्रतिमा सुखकारक, आल्हाददायक अनुभूतींचा प्रत्यय देते. तर पाऊस हा आनंदाचे प्रतीक म्हणून आलेला आहे. ‘आई’ या संहितेत ‘चांदण्यांचा अलवार पाऊस’ या शब्दकळेतून कवी प्रतिमा व प्रतिकाची एकात्मिक योजना करून कवितेतील आशयाला अर्थदृष्ट्या व्यापकता प्राप्त करून देतो.

देसलेंच्या कवितेत वर्तमानाविषयीचे भाष्य कसे अवतरते हे पाहणे रंजक ठरते. उदाहरणार्थ, वर्तमानाचा अजस्त्र जबडा, टोकदार वर्तमान, अस्वस्थ वर्तमान, वर्तमानाचा सांगाडा, दुखरा वर्तमान, वर्तमानाचे आडवे–तिडवे जोरदार स्ट्रोक्स, हरवलेल्या वर्तमानाचे संक्रमण अशा नानाविध रूपांतील वर्तमानाच्या तडाख्यात रस्त्यारस्त्यांवर हिंसेचा सुसाट घोडा सैरभैर उधळत असल्याने मूल्यांची झालेली पडझड पाहून कवी आपल्या काळाला ‘रक्तवर्णी काळ’ संबोधतो. जातीय द्वेष, धार्मिक तेढ यामुळे बेलगाम घोड्यांप्रमाणे बेछूट हिंसक झालेल्या क्रूर प्रवृत्तींना धरबंध घालणे राजकीय सत्तेच्या हातात असताना हे खेळ क्रूरपणे पाहिले व खेळलेही जातात. अशा स्थितीत माणसे रस्त्यावर भिरभिरताहेत कसे कवी म्हणतो. कवी वर्तमानातील माणसांची स्थिती ही रंग उडालेल्या फुलपाखरांसारखी झाल्याचे सांगतो. फुलपाखरांचे रंग ही त्यांची ओळख. रंग उडून जाणे म्हणजे फुलपाखरांचा मृत्यू समीप असल्याचे समजते. समकालीन माणसांच्या नित्य जीवनातील धावाधाव, अनाठायी स्पर्धा, संपत्तीच्या हव्यासापोटी माणसांनी वाढवून घेतलेला ताणतणाव हा प्रत्येकाच्या छाताडात धडधड घडवून आणत आहे. हा ताणतणाव अनेकांच्या मृत्यूचे कारण ठरताना दिसतो. महानगरात बोकाळलेल्या हिंसाचाराच्या घटनांनी दहशतीची मुळे

सर्वदूर पसरली आहेत. अशा स्थितीत ज्या विचारवंतांनी नेटकी भूमिका घ्यायला हवी त्यांनीच धर्म आणि अध्यात्म एकाच गाठोड्यात बांधून ठेवलेत, असा उपहास केलेला आहे. अशा स्थितीत धार्मिक सौहार्दाचे, मानवतेचे, प्रेमाचे दर्शन घडविणारी गुड न्यूज गायब झाल्याची खंत कवी बोलून दाखवतो. यातून वृत्तसेवांच्या बदललेल्या स्वरूपाची झलक प्रदर्शित होते.

सामान्य माणूस मात्र कष्टाळू, सोशिक आणि सद्वर्तनी राहण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत असतो. तो जातीय तेढ, धार्मिक हिंसाचाराच्या विरोधात असतो. 'कॉमन मॅन' या कवितेत अशा कष्टकरी माणसाची प्रतिमा चित्रित करण्यात आली आहे. जीवनात संघर्ष, दुःख अपरिहार्य आहेत हे त्याने गृहीत धरले आहे. अशा सामान्य माणसाला दुःखाची लिपी अवगत झाली आहे. सर्व प्रकारच्या भौतिक विकासाचे श्रेय या सामान्य माणसाच्या कष्टांना दिले पाहिजे, अशा शब्दांत सूचक आशय घडवून कवीने अशा कॉमन मॅनला स्थितप्रज्ञ आणि अविचल म्हटले आहे. सामान्य माणसाचे कोणत्याही प्रकारच्या हिंसाचाराच्या घटनांत सहभागी न होणे हे त्याचे वर्तन कवीला एखाद्या तत्त्वज्ञानाप्रमाणे वाटते. सामान्य माणसांविषयीचे हे चिंतन समकालीन मराठी कवितेत निराळे आहे. 'समर्पण' या कवितेत कवी पंढरपूरच्या दिशेने पायी जाणाऱ्या दिंडीतील वारकरी हरीनामाच्या भक्तीरसात न्हाऊन निघालेले असताना त्यांच्या या रूपाकडे नितळ आध्यात्मिक वृत्तीने पाहण्याची दृष्टी वाचकांना देतो. यातील दृश्यमयता लक्षणीय आहे.

भौतिक वस्तुंविषयीचे चिंतन हा एक चिंतनप्रकार देसलेंच्या कवितेत विशेषत्वाने अनुभवाला येतो. उदाहरणार्थ 'खिडकी' या कवितेत खिडकीला मानवी जीवनव्यवहारात असलेले अनन्यसाधारण महत्व अधोरेखित होते. खिडकी म्हणजे बाहेरच्या जगात डोकावण्याची जागा, असे धोपट वर्णन न करता कवी खिडकीचे जिवंत व्यक्तिमत्त्व कल्पून खिडकी ही विचारी, संवेदनशील व बऱ्या-वाईट घटनांची डोळस साक्षीदार असून ती कित्येक पिढ्यांपासून स्थितप्रज्ञ आहे. किंबहुना तिने आपल्या गजांवर सूर्यकिरणे गोंदवून घेतली असून खिडकी उघडली की, प्रत्येकाच्या मनात उजेडाचा गोतावळा चांगुलपणाचे रूप घेऊन हजर होतो. खिडकीचे डोळसपण, तिची स्थितप्रज्ञ वृत्ती व प्रत्येकाच्या मनात उजेडाचा गोतावळा पेरणे, ही घटिते कवीच्या विलक्षण कल्पकतेचा प्रत्यय देणारी आहेत. यातून घराच्या दरवाजापेक्षा खिडकीचे महात्म सूचित होते. वस्तुमहात्म्य हा देसले यांच्या कवितेतील चिंतनाचा नवा पैलू वेधक आहे. असेच एक अनोखे चिंतन 'व्हायोलिन' या कवितेत अनुभवाला येते.

कवीची चिंतनशील वृत्तीच त्याला आत्मशोधाकडे घेऊन जाते. हा आत्मशोध डोळे सताड उघडे ठेवून नव्हे तर त्यात अंधारालाही पारदर्शक रूप साठवल्यावर सुरू होतो. असे झाले की, आत्म्याच्या पातळीवरील मनाची निरागसता आणि विशुध्दता आकाराला येते. याविषयीची अधिक उत्कट अनुभूती अशा प्रकारे व्यक्त झाली आहे. '...आत-आत खोल/ स्वतःला शोधत जाणं म्हणजे/ मौनाची वीण हलकेच/ उसवत

जाणं/ सोबत/ निःशब्द कल्लोळ/ आतल्याआत.../ आतल्या घुसमटीचा तळ/ ढवळून निघाला की,/ जगण्याच्या आशयाची/ दास्तान अधिकच/ बोलकी होत जाते./ मौनाच्या लाटा/ ओसरल्यावर....' (अवघेचि उच्चार, पृ.२९) असे चिंतनशील आत्मशोधाचे विरळे रूप राजू देसलेंच्या कवितेत भेटते. संवेदनशीलता आणि सत्त्वशीलतेचा निरलस अनुभव यातून येतो. मौनाची वीण उसवणे, निःशब्द कल्लोळ, घुसमटीचा तळ ढवळणे, जगण्याच्या आशयाची दास्तान या प्रतिमा व मौनाच्या लाटा या अभिनव तात्त्विक प्रतिकाची योजना करून कवी कवितेच्या सूचकतेला अर्थबहुल करतो. 'उद्‌गार' या कवितेत चित्रकाराच्या चित्रनिर्मितीच्या अनुभूती उत्कटतेने मांडलेल्या आहेत. चित्रनिर्मितीचा सशक्त आणि प्रगल्भ अनुभव कवीच्या चित्रकलासन्मुख वृत्तीची साक्ष देतो. कलावंताचे निखळ कलामयी असणे हे त्याला शुध्द निःसंगत्वाकडे घेऊन जाते. ही वैचारिकता कवीच्या तत्त्वज्ञवृत्तीचा दाखला ठरते. आत्मशोधाची सवय हरेक माणसाने आपलीशी केली तर हे जग किती सुंदर होईल. मग प्रत्येकाच्या आत्मशोधाचे ब्रह्म हेच एक सत्य बनेल. अशी बाहेरच्या कोलाहलातही आतल्या कोलाहलाकडे पाहायला शिकवणारी, निखळ आत्मशोधाकडे घेऊन जाणारी राजू देसलेंची कविता सात्त्विक चिंतनशीलतेचा निखळ प्रत्यय देणारी कविता आहे. यातील स्त्रीचित्रण पारंपरिक स्त्री शोषणाचे कंगोरे दाखवणारे आहे. दुःख हा विषय या कवीच्या चिंतनात पुन्हा-पुन्हा येतो. दुःख आणि निर्मिती, दुःख आणि जीवन या द्वंद्वात कवी सतत आत्मशोध घेत राहतो. त्यामुळे कवीचे पडझडीचे सल सुगंधी होतात. आतल्या धगीचा सहजपणे उत्सव होतो. हळव्या क्षणांचा मोर होतो. अंतःस्वरांची रूणझुण घेऊन त्याच्या सृजनदिंडीचा प्रवास उजेडाच्या दिशेने जातो.

देसलेंच्या कवितेत सप्तश्रृंगी देवी, विठ्ठल, ख्रिस्त, सिंकदर व मोनालिसा ही मिथके आलेली आहेत. त्यातील महामाया हे मिथक वैशिष्ट्यपूर्ण आहे. वणी येथील सप्तश्रृंगी देवीला महामाये हे विशेषण योजलेले आहे. या कवितेत सप्तश्रृंगी देवीचे मिथक साकारलेले आहे. सप्तश्रृंगी देवीशी केलेला हृदयस्थ संवाद म्हणजे ही कविता होय. कवितेत महामाया सप्तश्रृंगी देवी, कवितेतील 'मी' व अन्य लोक यांच्या आंतरसंबंधाचे अवकाश चितारण्यात आलेले आहेत. कवितेच्या पूर्वार्धात कवितेतील 'मी' स्वतःच्या व इतरांच्या लोभी श्रध्देविषयीची झाडाझडती देतो. नवससायासासाठी घाटातून प्रवास करत सप्तश्रृंगी प्रवास करत सप्तश्रृंगी गडाच्या शेकडो पायऱ्या चढून दर्शनासाठी आलेल्या भक्तगणांचे बारी लागल्यावर श्वास फुलतात. प्रसंगी गर्दीमुळे एकमेकांना रेटारेटी करणे सुरू होते. भक्त अखेर देवीपर्यंत पोहोचतात. कवितेतील 'मी' ही असाच पोहोचलेला असावा. 'श्रध्दांची टिपं अध्यात्माच्या वळचणीखाली गळणे' या प्रतिमेतून कवितेतील 'मी'ची पापभिरू वृत्ती व अध्यात्माकडे वळचणीप्रमाणे म्हणजे दुय्यम दृष्टीने पाहिले जात असल्याची कबुली दिली जाते. शेकडो वर्षांनंतरही प्रचलित दर्शनपदध्तीने देवीचे साक्षात दर्शन होत नाही. या अर्थाने सगुण-निर्गुणांचा रांजण कोरडाठाक वाटणे स्वाभाविक आहे. भक्तांचा भाबडेपणा

देवीने स्वीकारल्याचे कुतूहल 'श्रमाचं भाबडं पाणी कसं सरकत जातं तुझ्या पसाभर कुंकवात' या ओळीतून व्यक्त करण्यात आलेले आहे.

व्यक्तिमत्त्वात अनासक्त वृत्ती रूजल्याशिवाय आध्यात्मिक विकास होऊ शकत नाही. आध्यात्मिक परिपक्वतेशिवायची श्रध्दा आसक्तीच्या शृंखलांनी जखडलेली असते. लौकिक जीवनात सुखोपभोगाच्या अनेक वस्तू प्राप्त करण्यासाठी माणूस सतत धडपडत असतो. मौलिक वस्तू, अलंकार हवेहवेसे वाटणे, ही आसक्तीच होय.पैशांचा गरजेपेक्षा अधिक हव्यास, स्थावर जंगम मालमत्तेचा हव्यास, शरीर व मनाचे चोचले पुरविण्यासाठी नैतिकदृष्ट्या तडजोडी करणे आदी आसक्तीचीच उदाहरणे होत. ही आसक्तीच माणसाला माणसापासून दूर नेते. या आसक्तीचा इतिहास देवीच्या नाकात लोंबत असलेल्या नथीपर्यंत मागे नेता येतो, असे कवी म्हणतो. स्त्रियांत अलंकारांबाबत जी आसक्ती दिसून येते तिचे आदिबंधात्मक नाते महामायेच्या नथ घालण्याशी जोडण्यात येते. देवीच्या बाजूला असलेल्या पाषाणाला सिसिफसच्या दगडाची उपमा देवून कवी देवीच्या मानवी रूपाकडे आपले लक्ष वेधतो. सिसिफसला देवांनी शिक्षा दिली. त्याला झालेल्या यातनांवर त्याने विजय मिळवून स्वतःची प्रतिमा उजळवली. त्याप्रमाणे देवीलाही स्त्री म्हणून ऐहिक जीवनात अपार यातना सोसाव्या लागल्या. सिसिफसप्रमाणेच दुःख, यातना सोसल्याने देवीला श्रेष्ठत्व प्राप्त झाले. सिसिफसची कथा ही लिखित परंपरेतून जगभर पोहोचली. महामायेची कथा मौखिक परंपरेतील असल्याने ती आपल्या विशिष्ट सांस्कृतिक परिघाच्या बाहेर गेली नाही. देवीने संस्कृतीचा उद्धार केला आणि धर्माला व्यापक करून ती सर्वहितरक्षक बनली. तिच्या या कर्तृत्वाची कृपा आपल्यावर अशीच राहावी. ढोंगी भक्तांच्या प्रार्थनांचा आवाज तिच्यापर्यंत पोहोचत नाही म्हणून देवीच्या खऱ्या अस्तित्वाचा प्रत्यय जो सिसिफसच्या रूपात कवितेतील 'मी'ने अनुभवलेला आहे. तो अनुभव जगण्यासाठी कवितेतील 'मी' देवीपर्यंत पोहोचण्याची आर्त इच्छा व्यक्त करतो. चित्रमय शैली अल्पाक्षरत्व, सूक्ष्मता व व्यापकता ही राजू देसले यांची काव्यशैली विशिष्टता प्रत्ययाला येते.

राजू देसलेंच्या कवितेतील चिंतनाचा प्रवास अंतर्मुख करणारा असून पाण्याच्या खोल तळाशी पडलेला शब्द तरंगून वर आल्यावर त्याचं फूल होतं का? असा निरागस प्रश्न करणारा असल्याने माणसाच्या हरवलेल्या माणूसपणाकडे घेऊन जाणारा आहे. म्हणून 'अवघेचि उच्चार' मधील कविता संख्येने कमी वा रचनादृष्टीने अल्पाक्षरी असली तरी तिच्यातील ध्वन्यात्मकता, रूपदक्षता व दार्शनिकता यासारख्या गुणांमुळे ती विशेष ठरते.

**('अवघेचि उच्चार', राजू देसले, कॉपर कॉईन, नवी दिल्ली. पृष्ठसंख्या : २२ डिसें.२०२१, किं. रु.१९९/-)**

**(डॉ. अरुण ठोके, ०६, जें. पी. रो-हाऊस, ओंकारेश्वर नगर, अमृतधाम पंचवटी, नाशिक-४२२००३. मो. ९१७५१६४७९९)**